नवराष्ट्र
www.navarashtra.com

# महादुला शिबिरात आर्थिक जागरूकता

## ई-केवायसी व योजना नोंदणी, ग्रामीण भागात मोठा प्रतिसाद

**कोराडी,** वार्ताहर. नागपूर जिल्ह्यातील महादुला ग्रामपंचायतीत शुक्रवारी 'वित्तीय समावेशन संतृप्तीकरण शिबिर' भरवले गेले. या शिबिराचे आयोजन भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सहकार्याने बँक ऑफ इंडियातर्फे करण्यात आले. शिबिराला ग्रामपंचायत परिसरात सकाळपासून महिला, तरुण, ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



शिबिरात नागरिकांनी केवायसी व ई-केवायसीची प्रक्रिया पूर्ण केली तसेच नवीन जनधन खाते उघडले. याशिवाय प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, सुरक्षा विमा योजना व अटल पेन्शन योजनेत नोंदणी केली. डिजिटल फसवणूक प्रतिबंधाबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे दीपप्रज्वलनाने शुभारंभ झाला. प्रमुख अतिथींमध्ये आरबीआयचे कार्यकारी संचालक चारुलता एस. कर, क्षेत्रीय संचालक सचिन वाय. शेंडे, मुख्य महाव्यवस्थापक सजाता लाल यांचा समावेश होता. बँक ऑफ इंडियाच्या शाखा व्यवस्थापकांनी आणि ग्रामपंचायत सदस्यांनीही मार्गदर्शन केले. प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेअंतर्गत दोन लाख रुपयांचा प्रतीकात्मक धनादेश लाभार्थी कुटुंबांना प्रदान करण्यात आला. शिबिरात महिलांनी बचत गटांसाठी योजना समजून घेतली, तर तरुणांनी डिजिटल बँकिंगमध्ये रस दाखवला. महादुला परिसरातील नागरिकांनी या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून, अशा उपक्रमांनी ग्रामीण आर्थिक साक्षरतेला मोठा हातभार लागेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

Orange City Metro Edition
Aug 11, 2025 Page No. 5
Powered by: Navarashtra.com